# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०२/०७/२०२४

# प्रेसनोट

आज दि. ०२/०७/२०२४ रोजी मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. अजीज शेख यांच्या अध्यक्षतेखाली विविध दिव्यांग संघटनांची बैठक मा. स्थायी समिती सभागृह, पहिला मजला, उल्हासनगर महानगरपालिका येथे आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस महापालिका प्रशासनाच्या वतीने अतिरिक्त आयुक्त मा. श्री. जमिर लेंगरेकर, उपायुक्त डॉ. सुभाष जाधव, मालमत्ता व्यवस्थापक श्रीम. अलका पवार, वाहन व्यवस्थापक श्री. विनोद केणी, उपमुख्यलेखा परीक्षक श्री. विलास नागदिवे, लेखा अधिकारी श्री. संजय वायदंडे, दिव्यांग कल्याणकारी योजना विभागाचे विभाग प्रमुख श्री. राजेश घनघाव, जनसंपर्क अधिकारी श्रीम. छाया डांगळे, कनिष्ठ अभियंता श्रीम. कोमल आशान तसेच दिव्यांग संघटनांच्या वतीने डॉ. अशोक भोईर, श्री. सचिन सावंत, श्री. राजेश साळवे, श्री. नरेश गायकवाड, श्री. स्वप्निल पाटील व श्री. निलेश जाधव हे उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये दिव्यांग संघटनांनी केलेल्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहे.

- ऑगस्ट २०२४ पासून प्रत्येक दिव्यांगांना प्रोत्साहन अनुदान (पेन्शन) रूपये २२००/- देण्यात येणार आहे.
- दिव्यांगाच्या हितासाठी कार्यरत असलेल्या संघटनांची गत तीन वर्षाचे ऑडीट व इतर बाबी तपासून महापालिका स्थरावर समिती स्थापन करण्यात येणार आहे.
- दिव्यांगांना महापालिका परिवहन विभागामार्फत सुरू असलेल्या बसेस मध्ये मोफत प्रवासाची मुभा देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे पाहून निर्णय घेण्यात येईल.
- महापालिकेच्या शौचालयांमध्ये दिव्यांगांसाठी रॅम्प सुविधा देणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागस आदेशित करण्यात आले आहे.
- संघटनांच्या मागणिनुसार पावसाळया सुरू असल्याने दिव्यांग बांधवांना छत्री वाटप करणेबाबत निर्णय घेण्यात आला.
- दिव्यांगांना उदरनिर्वाहासाठी स्टॉलसाठी जागा देण्यासंदर्भात् समिती गठीत झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

या सर्व विषया संदर्भात मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. अजीज शेख यांनी घेतलेल्या निर्णयाचे सर्व संघटनांनी आभार व्यक्त केले आहे.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितोस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.